# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**

**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.२९५५/२०२४/जळगाव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. संध्या नरेश महाजन,<br>रा. मल्हारपुरा, चोपडा,<br>ता. चोपडा, जि. जळगांव. | अव्वल कारकुन,<br>(नपा-3), नगर पालिका शाखा,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव,<br>ता. जि. जळगाव. | सहायक आयुक्त (न.पा),<br>नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी<br>कार्यालय, जळगाव,<br>ता. जि. जळगाव. |

**सुनावणी दिनांक — १०/१०/२०२४**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. **व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २८/१२/२०२२

(२) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती व अपिलाअंतर्गत अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती मिळणे.

(३) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २९/०८/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२/०९/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१८-१९ ते दि. २९/०८/२०२२ पर्यंत

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** चोपडा न.प. शौचालय साफसफाई कंत्राटातील अनियमिततेबाबत वेळोवेळी केलेले अर्ज व त्यावर झालेल्या कारवाईबाबत एकुण ९ मुद्यांची माहिती/नक्कल मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१०/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली मुद्देनिहाय माहिती दिली आहे.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १५/११/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३/११/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : काही मुद्यांबाबत माहिती देण्यात आलेली नाही व चुकीची तसेच दिशाभुल करणारी माहिती.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७/१२/२०२२ रोजी अपिल निकाली काढण्यात येत आहे असे आदेश पारीत केले आहेत.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा —** सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थी यांना विहित मुदतीत दि. १०/१०/२०२२ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिलेली आहे.

६. निष्कर्ष –

- अपिलार्थी यांनी केलेल्या माहिती अर्जामध्ये एकुण ९ मुद्यांची माहिती मागणी केल्याचे दिसून येते.
- अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दि. १०/१०/२०२२ रोजी माहिती दिलेली आहे.
- तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (न.पा.) जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव यांनी प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी घेऊन प्रथम अपिल निकाली काढण्यात येत असल्याचे आदेश पारीत केल्याचे दिसून येते.
- अपिलार्थी यांनी केलेल्या माहिती अर्जामध्ये सन २०१८-२०१९ पासुन माहिती मागितली आहे, तथापि नेमक्या कोणत्या दिनांकापासून माहिती हवी आहे तो दिनांक स्पष्टपणे नमूद केलेला नसल्यामुळे माहितीचा अर्ज मोघम स्वरुपाचा ठरतो.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (नपा-३), जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवुन अवलोकनासाठी कळवावे व अवलोकनानंतर त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन ५० पृष्ठापर्यंतची माहिती १५ दिवसांत समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी व अपिलार्थी यांना त्यापेक्षा अधिक पृष्ठांची माहिती हवी असल्यास विहित शुल्क आकारुन अपिलार्थीस पुरवावीत. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर पाठवावे.

२) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक २९५५/२०२४/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ओ- 3353

08 NOV 2024